# सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस अधीक्षकांची अभिनव संकल्पना

सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये दि. 23.04.2019 रोजी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मोठया प्रमाणात पोलीस बंदोबस्ताची तयारी करण्यात आलेली आहे. जिल्हयातील लोकसभा मतदार संघाचे क्षेत्रात एकुण 915 मतदान केंद्रावर मतदान होणार असुन या सर्व व्यवस्थेकरीता प्रशासनाने आवश्यक प्रमाणात पोलीस व होमगार्ड मनुष्यबळ पुरविले आहे.

सिंधुदुर्ग जिल्हयाव्यतिरीक्त बाहेरील जिल्हा व राज्यातुन पोलीस बंदोबस्त पुरविण्यात आलेला असल्याने सुमारे 1000 (पुरुष व महिला) पोलीस व होमगार्ड जिल्हयात बंदोबस्ता करीता दाखल झाले आहेत. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये लोकसभा निवडणुक अनुषंगाने त्यांना मतदान केंद्र, सेक्टर पेट्रोलिंग, झोनल पेट्रोलिंग ईत्यादी प्रकारचे कर्तव्य असल्याने पोलीस व होमगार्ड यांना 48 तासाहुन जास्त कालावधीकरीता ते व्यस्त राहणार आहेत. तसेच मतदान केंद्रावर नेमण्यात आलेले बंदोबस्ताचे पोलीस कर्मचारी व होमगार्ड यांना देखील एकदा मतदान केंद्रावर कर्तव्यावर गेल्यानंतर मतदान केंद्र सोडुन जाता येणार नाही त्यामुळे त्यांची गैरसोय होऊ नये म्हणुन त्यांना दैनंदिन वापरासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तु (उदा. टुथब्रश, टुथपेस्ट, तेल, साबण) यांसह अंत्यत चांगल्या दर्जाचे ORS पाऊच, बिस्किट बॉक्स, मिनरल वॉटर इ. वस्तुंचे एक उपयुक्त **"किट बॉक्स"** प्रत्येक पोलीस अधिकारी, पोलीस कर्मचारी व होमगार्ड यांना सिंधुदुर्ग जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री. दिक्षीत गेडाम यांनी पुरविली आहे.

सिंधुदुर्ग जिल्हा व जिल्हयाबाहेरील सुमारे 2200 हुन अधिक पोलीस अधिकारी, पोलीस कर्मचारी व होमगार्ड यांना प्रत्येकी एक किट बॉक्स आज दि. 21.04.2019 रोजी बंदोबस्त वाटप दरम्यान देण्यात आले.

परराज्यातील व जिल्हाबाहेरील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी सदरची अभिनव संकल्पना ही महाराष्ट्रामध्ये सर्वात प्रथम सिंधुदुर्ग जिल्हयातच अनुभवास आल्याचे बोलुन दाखविले व त्यांनी मा. पोलीस अधीक्षक, श्री. दिक्षीत गेडाम, यांचे व सिंधुदुर्ग पोलीस दलाचे आभार मानले.

******